क्रमांक:जिपना/मबाक/विअ(सां)/1250
कार्यालय, महिला व बाल कल्याण विभाग
जिल्हा परिषद, नागपूर.
दिनांक: 21.11.2022

# Appendix-A

## महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद,नागपूर

जि.प.सेस फंड योजना सन 2022-23 अंतर्गत मुलीना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे या योजनेतंर्गत

**ब्युटी पार्लर प्रशिक्षण देणे करीता संस्था निश्चिति चे नियम, अटी व शर्ती**

अभिव्यक्ती स्वारस्य EOI (Expression of Intrest) पध्दतीने निविदा प्रक्रिया फक्त mahatenders.gov.in पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे. व त्या बाबतची संपूर्ण कार्यवाही फक्त mahatenders.gov.in पोर्टलवर असून अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) पध्दतीने निविदा स्वीकृतीसाठी तांत्रिक बाबींचे कागदपत्र PDF मध्येच फक्त mahatenders.gov.in पोर्टलवर अपलोड करणेत यावेत.

### निविदेतील अटी व शर्ती खालील प्रमाणे.

1 . मा . मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद , नागपूर हे या अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) पध्दती निविदा सोबत जोडलेल्या तांत्रिक लिफाफा मध्ये दर्शविलेल्या तपशीलवार वर्णनाच्या प्रशिक्षण देणाऱ्या व स्किल इंडिया /NSDC/SSCBW/ MSRDC/ STATE SKILL COUNSIL अंतर्गत **नोंदणी असलेल्या पात्र संस्था कडूनच** अभिव्यक्ती स्वारस्य(EOI ) पध्दतीने निविदा मागणी करत आहे .

2 . निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता न करणाऱ्या अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) पध्दतीच्या निविदा अथवा सर्व अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) पध्दतीच्या निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा किवा संपूर्ण अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्यावर रद्द करण्याचा हक्क मा . मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद , नागपूर यांनी राखून ठेवला आहे .

3 . एकदा अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) निविदा सादर केल्यानंतर अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) निविदाधारकास अर्ज देऊन अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) निविदा माघारी घेता येणार नाही .

4 निवीदा ही रक्कम रु 30.00 लक्ष या किमतीची राहील.

5. EMD रक्कम रु 80000/- हे mahatenders.gov.in पोर्टलवरच ऑनलाईन पद्वतीने भरणा करणे बंधनकारक राहील.

6. निवीदा शुल्क रक्कम रु.4800/- हे mahatenders.gov.in पोर्टलवरच ऑनलाईन पद्वतीने भरणा करणे बंधनकारक राहील.

7 . प्रशिक्षणाची रक्कम आणि लाभार्थी संख्या अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) निविदात दर्शविलेल्या तुलनेत लाभार्थी संख्या (लक्षांक ) उपलब्धते नुसार कामी / जास्त होऊ शकतील .

8 . प्रशिक्षणवर्गासाठी प्रति लाभार्थी किमान तीन महिन्या / किमान 250 तास साठी ब्युटी पार्लर प्रशिक्षण प्रशिक्षण (कीटसह ) प्रती तास मंजुर दरानुसार किंवा अधिकतम रु 5000/- पर्यंत (लाभार्थी स्वहिस्सा 10 % सहित ) इतके अनुदान देय राहील . त्याहून अधिक प्रशिक्षण खर्च देय ठरणार नाही.

9 . प्रस्तावित प्रशिक्षण सर्व प्रवर्गाच्या लाभार्थींना देय राहील .लाभार्थी निवड हि महिला व बाल कल्याण समिती ,जिल्हा परिषद नागपूर यांच्या मार्फत करण्यात येईल .

10 . देयकातून शासनाच्या निर्देशानुसार TDS/GST/सुरक्षा ठेव अनामत व इतर करांची कपात करण्यात येईल ,सुरक्षा अनामत रक्कम लेखापरीक्षण झाल्याशिवाय परत दिली जाणार नाही. तसेच त्या रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही .

11 . ज्या अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) निविदाधाकाची अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) निविदा स्वीकृत होईल त्यांना शासकीय नियमा प्रमाणे देय होणा-या मुद्रांक पेपरवर (Stamp Paper) करारनामा करून देणे बंधन कारक राहील .

12 करारनामा कालावधीत केंद्र शासन किवा राज्य शासन यांचे मार्फत शासकीय दरात वाढ झाल्यास वाढीव दर वेगळा देण्यात येणार नाही .

13 . निविदेतील अटी व शर्ती मध्ये बदल अथवा शिथिल करण्याचा संपूर्ण अधिकार मा . मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे .

14 . फक्त mahatenders.gov.in पोर्टल वरील अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) निविदा द्वारे प्राप्त होणा-या प्रस्तावाचाच विचार केला जाईल. कार्यालयास परस्पर दिलेल्या प्रस्तावाचा व या पूर्वी सादर केलेल्या प्रस्तावाचा विचार संस्था निश्चिती साठी केला जाणार नाही .

Scanned with CamScanner

15 . mahatenders.gov.in पोर्टल वरील अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) निविदा बाबतीत कोणताही वाद निर्माण झाल्यास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी नागपूर यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील . याबाबत न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास सदर प्रकरण नागपूर येथील न्यायालय कार्यक्षेत्रातच दाखल होऊ शकतील .

16 . शासनाने वेळोवेळी निश्चित केलेले धोरण / बदल हे निवड संस्थेवर बंधनकारक राहतील .

17 . नागपूर जिल्ह्यातील 13 पंचायत समिती अंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी ठरवून दिलेल्या प्रत्येक पंचायत समितीमध्ये एक किंवा त्याहून अधिक गावामध्ये प्रशिक्षण आयोजीत करावे लागेल . ऐन वेळेस लाभार्थी संख्या कमी जास्त होण्याची शक्यता आहे

18 . संस्थेमार्फत प्रशिक्षण पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांची परीक्षा घेऊन प्रमाणपत्र देणे आवशक राहील . परीक्षा शुल्क खर्च संबंधित निवड अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) निविदाधारकाने करावयाचा आहे .

19 . अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) निविदाधारक हा तांत्रिक बाबीत पात्र ठरला तरच त्यांना कार्यादेश देण्याची कार्यवाही करण्यात येईल

20 . अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) निविदाधारक यांनी प्रस्तावीत प्रशिक्षण NSDC- BEAUTY&WELLNESS SECTOR यांचे मार्गदर्शक तत्वाप्रमाणे घेणे बंधनकारक राहील .

21 . अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) निविदाधारक यांनी प्रस्तावीत प्रशिक्षणा अंतर्गत द्यावयाचे ब्युटी पार्लर प्रशिक्षण कीटसह प्रशिक्षण माहिती पुस्तिका , वही , पेन , पेन्सील , खोड रबर अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) निविदा कालावधी संपण्यापूर्वी महिला व बाल विकास अधिकारी जि.प .नागपूर विभागात जमा करावे

22 . अभिव्यक्ती स्वारस्य (EOI ) निविदाधारक यांनी प्रशिक्षण कीट मध्ये विविध ब्युटी पार्लर प्रशिक्षणसाठी आवश्यक व वापरण्यास सुलभ असलेला साहित्य देणे बंधन कारक आहे .

23 . प्रशिक्षण अंतर्गत त्वचा व त्वचेचे कार्य , त्वचा दोष , फेसियल स्टेप ( वेगवेगळ्या प्रकारचे फेसियल ), थ्रेडिंग , वेक्सिंग , ब्लिचिंग, मेनिक्युअर , पेडी क्युअर ,केसांची निगा राखणे ,केसांचे प्रकार ,हेड मसाज , हेअर डाय , हीना डाय ,मेक अप ,मेहंदी , स्कीन कलर ,हेयर कट ,इत्यादी तसेच प्रस्तावीत प्रशिक्षण अंतर्गत NSDC BEAUTY & WELLNESS SECTOR – BEAUTY THEROPIST COURSE मार्गदर्शकतत्वा प्रमाणे घेणे बंधनकारक राहील .

24. प्रस्तावित प्रशिक्षणाची अंमलबजावणी हि जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत कार्यरत असलेले एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प अंतर्गत निश्चित केलेल्या स्थळावर बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे नियंत्रणात खाली पूर्ण करणे बंधनकारक राहील .

25 . सन 2022-23 मध्ये कोविड या संसर्गजन्य रोगामुळे कोरोनाग्रस्त बाधितांची संख्या वाढल्यास व शासनाचे निर्देश असल्यास (EOI ) निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार मा . मु . का . अ .जि.प नागपूर यांनी राखून ठेवले आहे .

**. mahatenders.gov.in पोर्टलवरील निविदेसोबत खालील कागदपत्रे असणे बंधनकारक राहील.**

**तांत्रिक लिफाफा**

1 . EOI निविदाधारकाच्या संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील .

2 . EOI निविदा मध्ये सहभाग घेणाऱ्या संस्थेस प्रस्तावित प्रशिक्षण देणेसाठी स्किल इंडिया/NSDC/SSCBW/ MSRDC/ STATE SKILL COUNSIL अंतर्गत मान्यता असणे आवश्यक आहे .

3 . EOI निविदा मध्ये सहभाग घेणाऱ्या संस्थेस 2019-20,2020-21,2021-22 चे Audit Report, आणी ITR RETURN RECEPIT जोडणे आवशक आहे .

4. EOI निविदाधारक यांनी GST क्रमांक , पॅनकार्ड क्रमांक , सन 2021-22 चे व्यवसाय कर ( Tax on Professions ) प्रमाणपत्र जोडावे .

5 . EOI निविदाधारक यांनी सप्टेबर 2022 पर्यंत GST भरणा केल्याची GSTR 3B प्रमाणपत्र जोडावी .

6 . EOI निविदाधारक यांचे केंद्र शासन अथवा राज्य शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळ्या यादीत समावेश केलेला नसावा, तसेच कोणत्याही विभागा मार्फत कोणत्याही प्रकारची चौकशी सुरु नसावी, या बाबत EOI निविदा कालावधीतील स्वयंघोषणा प्रमाणपत्र रु 500/- मुद्रांक ( Stamp Paper ) कागदावर जोडावे .

7 . EOI निविदाधारकाने सन 2019-20,2020-21,2021-22 या तीन वर्षातील वार्षिक उलाढाल ही EOI निविदाच्या एकूण रक्कमेच्या 100%

Scanned with CamScanner

असले बाबत सनदी लेखापाल (C.A)यांचे प्रमाणपत्र ( UDIN सह )जोडावे .

8 . EOI निविदाधारकाने अनुभव म्हणून किमान 3 वर्ष शासकीय विभागात प्रस्तावित प्रशिक्षण देण्याचे काम पूर्ण केले बाबत कार्यारंभ आदेश व आदेशाच्या अनुषंगाने कार्य पूर्णत्वाचा दाखला ( अनुभव प्रमाणपत्र ) जोडावे .

9 . निविधाधारक यांनी EOI निविदासोबत सादर करावयाचे सर्व कागदपत्र mahatenders.gov.in पोर्टलवर दिलेल्या जागेवरच Upload करावे .

10 . EOI निविदाधारक यांनी ISO - 9001 यांचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे .

11 . विहित नमुन्यात 100 रुपयांच्या स्टंप पेपरवर Undertaking प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे .

13 . EOI निविदाधारक यांना प्रस्तावित प्रशिक्षण देणे कामी एकूण लाभार्थींच्या किमान 25 % लाभार्थी यांना एकावेळेस प्रशिक्षण देणे करीता प्रशिक्षण साहित्य पुरेल इतके साहित्य पुरवठा करणेबाबत रक्कम रु . 500 / - मुद्रांक कागदावर हमीपत्र जोडावे .

14. निविदेतील सर्व अटी आणि शर्ती मान्य असल्याबाबत 100/- मुद्रांक ( Stamp Paper ) पेपरवर प्रमाणपत्र जोडावे .

दिनांक - / /2022

( EOI निविदाधारकाची स्वाक्षरी )
संपूर्ण नांव व पत्ता व शिक्का

**जिल्हा कार्यक्रम अधिकारी ( बाक )**
**जिल्हा परिषद , नागपूर**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद , नागपूर**

Scanned with CamScanner

**लिफाफा क्र.२ -- वित्तीय लिफाफा**

**(महिला व बाल कल्याण विभाग)**

**जि.प.सेस फंड योजना सन 2022-23 अंतर्गत मुलींना व महिलांना व्यावसायीक व तांत्रिक प्रशिक्षण देणे (90% अनुदानावर) या योजनेअंतर्गत ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण या विषयाचे प्रशिक्षणाकरीता दर नमुद करणेबाबत.**

**प्रती,**

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपूर.**

विषय :- **ब्युटी पार्लर (सौदर्य प्रसाधन) प्रशिक्षण या विषयाचे प्रशिक्षण देण्याकरीता प्रती प्रशिक्षणार्थी दर नमुद करणेबाबत**

उपरोक्त विषयांकीत प्रशिक्षण देण्याकरीता दैनिक ............................................ या वृत्तपत्रातील जाहीरात मी / आम्ही पुर्णपणे वाचली असुन जाहीरातीमध्ये नमुद अटी व शर्ती मला /आम्हाला मान्य आहेत तसेच जाहीरातीमध्ये नमुद करण्यात आलेल्या तालुक्यातील गांवामध्ये मी / आम्ही प्रशिक्षण देण्यास तयार असुन खालील नमुद प्रशिक्षणाकरीता प्रती लाभार्थी दर खालील प्रमाणे नमुद करीत आहे / आहोत.

| अ क्र | प्रशिक्षणाचे नांव | प्रशिक्षण देण्याचे ठिकाण | प्रती लाभार्थी कोर्स फी (परिक्षा फी, निकालपत्र व इतर सर्व खर्चासह) |
|---|---|---|---|
| १ | जि.प.सेस फंड योजना सन 2022-23 अंतर्गत मुलींना व महिलांना व्यावसायीक व तांत्रिक प्रशिक्षण देणे (90% अनुदानावर) या योजनेअंतर्गत ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण | महिला व बाल विकास समिती/तालुका स्तरावरील बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी निश्चीत केलेल्या ठिकाणी | |

निविदा धारकाची स्वाक्षरी ,

दिनांक :-

शिक्का,

पुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक

ठिकाण :-

Scanned with CamScanner